मराठी प्रा. वैशाली आर चौधरी

उद्दिष्टे:

१. विद्यार्थ्यांना मराठी भाषेचं, त्यातील साहित्याची आणि संस्कृतीची ओळख करून देणे.

२. विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्याची आवड निर्माण करून त्यांची वाचनक्षमता विकसित करणे.

३. साहित्यकृती समजावून त्याची समीक्षा करण्याची क्षमता निर्माण करणे.

४. साहित्य आणि वास्तवता यांची सांगड घालणे.

५. मराठी साहित्यातील विविध प्रवाह तसेच प्रकार समजावून देणे.

६. मराठी व्यावहारिक भाषिक कौशल्ये विकसित करून त्याची जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिक्कून कसे राहता येईल ते समजावणे.

७. एम पी एस सी स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी भाषेचे महत्व समजावून नागरी परिक्षांसाठीसुद्धा मराठी चे महत्व जाणून आवड निर्माण करणे

परिणाम/ निष्पत्ती:

मराठी विषयामुळे खालीलप्रकारे कला शाखेचे विद्यार्थी सक्षम होतील.

१. मराठी साहित्याबद्दल ज्ञान, कौशल्य,आणि मराठी साहित्याबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होईल.

२. विश्लेषणात्मक विचार, सामाजिक संवाद आणि सांस्कृतिक जाणीव विकसित होईल.

३. साहित्यामुळे समाज कसाकसा बदलत गेला हे समजेल.

४. साहित्यातील अनुभवविश्वामुळे विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन बदलून त्यांच्यात आत्मविश्वास आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होईल.

५. मराठी साहित्यात आपले योगदान देण्याकरिता त्यांची लिखाण क्षमता विकसित झालेली असेल.